**“फेब्रुवारी २०२२” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक १ फेब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) १५ नविन झेरॉक्स मशिन भाडेतत्वावर घेण्यास मंजूरी देण्यात आली आहे.
- दिनांक ०१ फेब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये वित्तीय वर्ष २०२१-२२ करीता वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता ३६-सहायक अनुदान (वेतन) या बाबीखाली माहे जानेवारी २०२२ व फेब्रुवारी २०२२ करीता अनुदान वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंजूर तरतूदीमधून राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मूल्यमापन यंत्रणा, याशदा पुणे, ६ विभागीय व ३६ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना प्रशासकीय प्रशिक्षणाकरिता, (प्रशिक्षण शुल्क ) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या प्रशासकीय प्रशिक्षण आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १६ फेब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता आर्थिक वष सन २०२१-२२ साठी यशदा, पुणे या संस्थेस अनुदान वितरित करण्यास(वेतनेतर) मंजूरी देण्यात आली आहे.
- दिनांक २३ फेब्रुवारी २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करणेबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक २४ फब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबाधिनी, अमरावती या संस्थेस सन २०२१-२२ करिता (३६ सहाय्यक अनुदान वेतने )(अनिवार्य) रू.३,६५,११६/- वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २५ फेब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी कार्यालयातील २४ अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२२ ते दिनांक ३१.०८.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक २५ फेब्रुवारी २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये सन २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षेच्या निकालाच्या गुणांची फेरमोजणी करून सुधारीत गुणांचा तपशील देउुन अंतिम निकाल देण्यात आला आहे.
- दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयांच्या आस्थापनेवरील ३०८ अस्थायी पदांना दिनांक ०१ मार्च २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक २८ फब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये वित्तीय वष २०२१-२२ करिता वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ३६- सहाय्यक अनुदान ( वेतन ) या बाबीखाली जानेवारी २०२२ व फेब्रुवारी २०२२ करीता आगाऊ अनुदान वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

**(ख) नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- मंत्रालयीन विभागातील गट-ड मधील तीन कर्मचाऱ्याला गट-क संवर्गामध्ये तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे.
- मंत्रालयीन कक्ष अधिकारी गट-ब संवर्गातील १५ उमेदवारांना दोन वर्षाच्या एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षणाकरिता परिविक्षाधीन कक्ष अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे.
- एकूण पाच अधिकाऱ्यांना उप सचिव पदावर प्रपत्र पदोन्नती देण्यात आली आहे.
- एकूण चार अधिकाऱ्यांना सह सचिव पदावर प्रपत्र पदोन्नती देण्यात आली आहे.
- मराठा समाजाच्या मागण्यांच्या अनुषंगाने समन्वय व अंमलबजावणीसाठी एका सह सचिवाची नियुक्ती करण्यात आली आहे.

**(ग) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त</u>**

- एका उच्चश्रेणी लघुलेखकाची बदली करण्यात आली आहे.
- एका उच्चश्रेणी लघुलेखकाची बदली करण्यात आली आहे.
- तीन कक्ष अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- दोन कक्ष अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेत बदल करण्यात आले आहे.

**(घ)<u>प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>**

- एका कक्ष अधिकाऱ्याचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- एका सहाय्यक संचालकास प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
- एका अवर सचिवांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- एका अवर सचिवाची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.
- एका अवर सचिवाचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

*****